मसुदा
क्र.८/२०१२-२०१३

गोपनीय
व्यवस्थापन परिषद
२२ फेब्रुवारी, २०१३

# मुंबई विद्यापीठ

व्यवस्थापन परिषदेची विशेष सभा विद्यापीठाचे सर फिरोजशहा मेहता व्यवस्थापन परिषदेचे दालन, विद्यापीठ इमारत, उत्तर विभाग, फोर्ट, मुंबई- ४०० ०३२, येथे ***शुक्रवार, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी सकाळी ११.३०*** वाजता सुरू झाली. सभेमध्ये खालील नमूद केल्याप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. डॉ. राजन वेळूकर (कुलगुरू)
२. डॉ. नरेश चंद्र (प्र-कुलगुरू)
३. डॉ. सुरेश कि. उकरंडे
४. डॉ. गुरूनाथ वा. पंडीत
५. डॉ. प्रल्हाद जी. जोगदंड
६. प्राचार्य (डॉ.) राजपाल एस. हांडे
७. प्राचार्य दत्ताजीराव यशवंतराव पाटील
८. प्राचार्य गोरक्ष व्ही. पारगांवकर
९. डॉ. बाळकृष्ण वि. भोसले
१०. डॉ. वसंत सिताराम शेकडे
११. डॉ. (श्रीमती) मधू सुधीर परांजपे
१२. श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे
१३. प्राचार्य डॉ. अशोक पा. महाजन
१४. डॉ. विजय भालचंद्र जोशी
१५. डॉ. सिध्देश्वर तुकाराम गडदे

श्री. दिपक जी. वसावे, प्रभारी परीक्षा नियंत्रक आणि श्री. अ.आ. फळणीकर हे कायम निमंत्रित म्हणून उपस्थित होते.

सर्वप्रथम कुलगुरूंनी व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांचे स्वागत केले.

यानंतर, डॉ. शरच्चंद्र गोखले, श्रीमती ज्योत्स्ना देवधर, श्री. म. वि. तथा मामासाहेब कौंडिण्य, ॲड. एम. पी. वशी आणि श्री. दत्ताजी नलावडे यांच्या दु:खद निधनाबद्दल परिषदेस पुढीलप्रमाणे माहिती देण्यात आली व श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

➢ **श्रध्दांजली –**

## डॉ. शरच्चंद्र गोखले

आंतरराष्ट्रीय ख्यातीचे समाजशास्त्रज्ञ आणि ज्येष्ठ पत्रकार डॉ. शरच्चंद्र गोखले यांचे दि. १५ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८७ वर्षांचे होते. राज्य शासनाच्या समाजकल्याण विभागात संचालक म्हणून प्रदीर्घ सेवा केली होती. त्यांनतर कम्युनिटी एड अँड स्पॉन्सरशिप प्रोग्राम, इंटरनॅशनल लेप्रसी युनियन आणि आंतरराष्ट्रीय दीर्घायू केंद्र भारत या तीन संस्थाची स्थापना केली होती. त्यांना अनेक पुरस्कारांनी गौरविण्यात आले होते.

Scanned by CamScanner

## श्रीमती ज्योत्स्ना देवधर

मराठीसह हिंदीमध्येही विपुल लेखन करणा-या आकाशवाणीच्या ज्येष्ठ निर्मात्या श्रीमती ज्योत्स्ना देवधर यांचे दि. १७ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८६ वर्षांच्या होत्या. सन १९६० च्या सुमारास आकाशवाणीवर निर्मात्या म्हणून त्यांनी काम केले होते. त्यानंतर सलग २४ वर्षे त्यांनी विविध जबाबदा-या हाताळल्या होत्या. त्यांना अनेक पुरस्कारानी सन्मानित करण्यात आले होते.

## श्री. म. वि. तथा मामासाहेब कौडिण्य

ज्येष्ठ शिक्षकतज्ज्ञ, जीवनगौरव पुरस्कार विजेते आणि संगमनेर महाविद्यालयाचे शिल्पकार श्री. म. वि. तथा मामासाहेब कौडिण्य यांचे वृद्धपकाळाने दि. २८ जानेवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८० वर्षांचे होते. श्री. कौडिण्य सलग ३३ वर्ष संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्यपदी होते.

## ॲड. एम. पी. वशी

ज्येष्ठ विधीतज्ज्ञ ॲड. एम. पी. वशी यांचे हृदयविकाराने दि. ११ फेब्रुवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ८२ वर्षांचे होते. ॲड एम. पी. वशी हे गेल्या ५६ वर्षापासून मुंबई हायकोर्टात वकिली करीत होते. बॉम्बे ॲडव्होकेट असोसिएशन, बॉम्बे सिटी सिव्हील ॲंड सेशन्स कोर्ट असोसिएशन व नॉर्थ बॉम्बे ॲडव्होकेट्स असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून त्यांनी काम केले होते. राज्यातल्या विधी महाविद्यालयांना शासकीय अनुदान मिळण्यासाठी त्यांनी मुंबई हायकोर्टात व सुप्रीम कोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. ॲड. एम. पी. वशी यांनी सन १९८७ साली मुंबई विद्यापीठाच्या अधिसभा सदस्य म्हणून काम केले होते.

## श्री. दत्ताजी नलावडे

नगरसेवक ते मुंबईचे महापौर व विधानसभेचे अध्यक्ष अशा राजकारणातील आपल्या यशस्वी कारकिर्दीमध्ये जनसामान्यांशी असलेली नाळ सतत जोडणारे ज्येष्ठ नेते श्री. दत्ताजी नलावडे यांचे दि. १५ फेब्रुवारी, २०१३ रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ७७ वर्षांचे होते.

- **अभिनंदन –**

- डॉ. उमा वैद्य – मुंबई विद्यापीठाच्या संस्कृत विभागाच्या विभागप्रमुख डॉ. उमा वैद्य यांची नागपूर जिल्हातील रामटेक येथील कवी कुलगुरू कालीदास संस्कृत विद्यापीठाच्या कुलगुरूपदी निवड झाली.

- राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) वर्षभरातील सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठीचा मानाचा 'पंतप्रधान बॅनर' सलग सहाव्या वर्षी महाराष्ट्र संचलनालयाने सर्वागीण विजेतेपदाची हॅट्रिक साधली. महाराष्ट्र पथकाच्या वतीने मुंबईच्या अग्रवाल महाविद्यालयांची प्रतिभा तिवारी व कल्याणच्या बिर्ला महाविद्यालयांचा अनिकेत जळगावकर या विद्यार्थ्यांना पंतप्रधानाच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

- सुरतच्या वीर नर्मद युनिव्हर्सिटीमध्ये पार पडलेल्या २८ व्या पश्चिम विभागीय युवा महोत्सवात मुंबई विद्यापीठाने २५ पैकी १८ स्पर्धामध्ये निर्विवाद वर्चस्व राखत विजेतेपद पटकावलं. या महोत्सवात भारताच्या पश्चिम विभागातील २९ विद्यापीठानी सहभाग घेतला होता.

- भारतीय विद्यापीठ असोसिएशनच्या वतीने कोलकता येथील कल्याणी विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय युवा सांस्कृतिक महोत्सवात मुंबई विद्यापीठातील कलावंतानी विविध स्पर्धामध्ये सलग तिस-यांदा देशभरात पहिले येण्याचा मान पटकावला. तसेच महोत्सवाच्या इतिहासात पहिल्यांदाच सर्वाधिक १०९ गुण मिळवून या विद्यार्थ्यांनी नवा विक्रम प्रस्थापित करत मुंबई विद्यापीठाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला आहे.

Scanned by CamScanner

बाब १: चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या शिफारशी नुसार विद्यापीठाने सन २०१२-२०१३ चे सुधारीत अर्थसंकल्पिय अंदाज व २०१३-२०१४ चे अर्थसंकल्पिय अंदाजाचा मसुदा व्यवस्थापन परिषदेच्या सूचनासहित मान्य करण्यात यावा व अर्थसंकल्पिय अंदाज मंजूरीसाठी अधिसभेला शिफारस करण्यात यावी.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेच्या वरील ठरावाची सूचना अधिसभेत देण्यासाठी डॉ. राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना नामनिर्देशित करण्यात यावे.

बाब २: चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, दिनांक १३ फेब्रुवारी, २०१३ रोजी संपन्न झालेल्या वित्त व लेखा समितीच्या शिफारशी नुसार मे. शरद एस्. गायकवाड आणि कंपनी यांनी सादर केलेले मुंबई विद्यापीठाचे सन २०१०-२०११ चे वार्षिक लेखे, दि. ३१ मार्च, २०११ चा ताळेबंद व त्यावरिल लेखा परिक्षण अहवाल. मान्य करण्यात यावा व सन २०१०-२०११ चे वार्षिक लेखा परिक्षण अहवाल मंजूरीसाठी अधिसभेला शिफारस करण्यात यावी.

बाब ३: असा ठराव करण्यात आला की, विद्यापीठाच्या २०११-२०१२ चा वर्षवृत्ताचा मसुदा (कालावधीः १ एप्रिल, २०११ ते ३१ मार्च, २०१२) मान्य करण्यात यावा व वर्षवृत्ताच्या मंजूरीसाठी अधिसभेला शिफारस करण्यात यावी.

पुढे असाही ठराव करण्यात आला की, व्यवस्थापन परिषदेच्या वरील ठरावाची सूचना अधिसभेत देण्यासाठी डॉ. राजपाल हांडे, संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ यांना नामनिर्देशित करण्यात यावे.

**"दुष्काळग्रस्तांना मुंबई विद्यापीठाकडून मदत"**

दिनांक २२ फेब्रुवारी, २०१३ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सन्माननीय सदस्य श्री. दिलीप करंडे आणि डॉ. विजय जोशी यांनी राज्यातील "दुष्काळग्रस्तांना मुंबई विद्यापीठाकडून मदत" करण्याबाबत मांडलेल्या ठरावास सर्व सदस्यांनी मंजूरी दिली व मुंबई विद्यापीठाकडून रूपये दहा लाखांची मदत जाहीर केली. तसेच मा. कुलगुरू, प्र-कुलगुरू, कुलसचिव, संचालक, महाविद्यालय व विद्यापीठ विकास मंडळ यांच्यासह सर्व सभासदांनी त्यांचा एका दिवसाचा पगार देण्याचा निर्णय घेण्यात आला.

विद्यापीठ व महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांनाही मदत करण्याचे आवाहन करण्यात यावे असे ठरविण्यात आले. विद्यापीठाकडे जमा होणा-या या सर्व निधीचा विनियोग दुष्काळग्रस्तांसाठी कसा करावा, हे ठरविण्यासाठी खालील समिती गठीत करण्यात आली.

१. श्री. गजानन (उर्फ) दिलीप अंबाजी करंडे
२. डॉ. (श्रीमती) मधू सुधीर परांजपे,
३. डॉ. प्रल्हाद गंगाराम जोगदंड,
४. डॉ. विजय भालचंद्र जोशी,
५. श्री. अ. आ. फळणीकर, सदस्य सचिव,
(वित्त व लेखा अधिकारी) मुंबई विद्यापीठ.

मुंबई- -४०० ०३२
७ मार्च, २०१३.

कुलसचिव
(मुंबई विद्यापीठ)

Scanned by CamScanner